अपर तहसिलदार पिंपरी चिंचवड ता.हवेली जि.पुणे
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयाची नविन प्रशासकिय इमारत आकुर्डी पुणे ४४

---

क्रं.जमीन/एनए/एसआर/३२५/२०१९
दि.१७/०७/२०१९

प्रति,

**गाव कामगार तलाठी रावेत**
**ता. हवेली, जि.पुणे**

**विषय :-** जमिन पुणे
मौजे रावेत, ता.हवेली येथील जमीन स.नं.७७/८ मधील मंजुर रेखांकन क्षेत्र ३९६०.०० चौ.मी. क्षेत्रापैकी रस्त्याकरीता व इतर बाधित क्षेत्र ४५४.७ चौ.मी. वजा क्षेत्र ३५०५.३ चौ.मी. क्षेत्रांस निवासी प्रयोजनार्थ अकृषिक झाल्याची नोंद घेणेबाबत.

**संदर्भ :-** १ अर्जदार श्री.अमोल काळूराम भोंडवे व इतर रा.आदर्शनगर, शिंदे वस्ती, रावेत, पुणे ४१२१०१ दि.१७/०७/२०१९ रोजी चा अर्ज
२ महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचेकडील दि. ०५/०१/२०१७ रोजीची अधिसुचना व शासन परिपत्रक क्र. एनए-२०१७/प्र.क्र.११५/टी-१ दि. १९ ऑगस्ट २०१७

मौजे रावेत, ता.हवेली येथील जमीन स.नं.७७/८ मधील मंजुर रेखांकन क्षेत्र ३९६०.०० चौ.मी. क्षेत्रापैकी रस्त्याकरीता व इतर बाधित क्षेत्र ४५४.७ चौ.मी. वजा क्षेत्र ३५०५.३ चौ.मी. क्षेत्रांस निवासी प्रयोजनार्थ अकृषिक आकारणी करुन मिळावी म्हणून अर्जदार श्री.अमोल काळूराम भोंडवे व इतर रा.आदर्शनगर, शिंदे वस्ती, रावेत, पुणे ४१२१०१ यांनी या कार्यालयाकडे संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.अर्जदार यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने आगाऊ बिनशेतसारा शासन जमा करणेबाबतच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | गावाचे नांव | तालुका | सर्व्हे नं./ ग. नं. | |
|---|---|---|---|---|
| १ | रावेत | हवेली | ७७/८ | |
| २ | जमिन मालकाचे नांव | स.नं./ ग. नं. | ७/१२ प्रमाणे एकुण क्षेत्र | बिनशेती करावयाचे क्षेत्र |
| ३ | रामदास किसन भोंडवे<br>बायडाबाई विश्वनाथ काळोखे<br>ठकुबाई किसन भोंडवे<br>गोपीचंद किसन भोंडवे<br>लक्ष्मीबाई दत्तात्रय भोंडवे | ७७/८ | ८०६६.०० चौ.मी. | ८०६६.०० चौ.मी. |
| ४ | | एकुण | ८०६६.०० चौ.मी. | ८०६६.०० चौ.मी. |
| ५ | अर्जदार यांनी रेखांकनात नकाशात समाविष्ट केलेले क्षेत्र | | | ३९६०.०० चौ.मी. |
| ६ | (-) रस्त्याखालील व इतर आरक्षण एकुण वजा क्षेत्र | | | ४५४.७ चौ.मी. |
| ७ | बिनशेती करावयाचे निव्वळ क्षेत्र | | | ३५०५.३ चौ.मी. |
| ८ | बिनशेती वापराचे प्रयोजन | | निवासी | ३५०५.३ चौ.मी. |

अर्जदार यांना या कार्यालयकडील पत्र क्र.जमीन/एनए/एसआर/३२५/२०१९ दि.१५/०७/२०१९ अन्वये खालीलप्रमाणे बिनशेतसारा शासनजमा करणेबाबत कळविणेत आलेले होते.

| अ.क्र. | प्रयोजन | निवासी |
|---|---|---|
| १ | बिनशेती आकारणी क्षेत्र चौ.मी मध्ये | ३५०५.३ |
| २ | बिनशेती आकारणीचा दर (प्रति चौ.मी.) | ०.५१ |
| ३ | बिनशेती करावयाच्या क्षेत्रावरील वार्षिक आकारणी | १७८८.०० |
| ४ | रुपांतरीत कराची रक्कम | ८९४०.०० |
| ५ | अनाधिकृत अकृषिक वापराबाबत ४० पट दंड | ०.०० |
| ६ | वसूल करावयाची एकुण रक्कम रुपये | १०७२८.०० |

वरीलप्रमाणे अर्जदार यांनी देय रक्कम ३५०५.३ चौ.मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ ०.५१ /- प्रती चौ.मी. या दराने वार्षिक आकारणी र.रु. १७८८.०० व रुपांतरीत कराची र.रु. ८९४०.०० असे एकूण **र.रु. १०७२८.००** एवढी रक्कम चलन GRN MH००४०८५२४३२०१९२०M दि.१७/०७/२०१९ रोजी शासकीय कोषागारात जमा करुन चलनाच्या प्रती या कार्यालयास सादर केलेल्या आहेत. तसेच विषयांकित मिळकतीवरील बांधकाम नकाशास पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी त्यांचेकडील क्र.बीपी/रावेत/६८/२०१९ दि.१८/०६/२०१९ अन्वये दिलेल्या प्रारंभ प्रमाणपत्राची व बांधकाम नकाशाची प्रत सादर केलेली आहे.

सबब, आपणांस याव्दारे कळविणेत येते की, विषयांकित जमिनीच्या गाव नमुना नं. ७/१२ व गाव नमुना नं. २ मध्ये अकृषिक झाल्याची नोंद **(बिनशेतीकडे क्षेत्र ३५०५.३ चौ.मी. निवासी)** क्षेत्राची नोंद घेणेसाठी चलनाची व बांधकाम नकाशाची प्रत सोबत जोडली आहे. सदरची नोंद गाव दप्तरी घेणेत येऊन दुरुस्त अधिकार अभिलेखातची प्रत अर्जदारास उपलब्ध करुन देणेत यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दुरुस्त अधिकार अभिलेखासह या कार्यालयास सादर करावा.

अपर तहसिलदार पिंपरी-चिंचवड ता.हवेली

(गीता गायकवाड)
अपर तहसिलदार पिंपरी चिंचवड
ता.हवेली जि.पुणे

**प्रत :-** १. श्री.अमोल काळूराम भोंडवे व इतर रा.आदर्शनगर, शिंदे वस्ती, रावेत, पुणे ४१२१०१
२. मा.कार्यकारी अभियंता,बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग,
पिंपरी चिंचवड महानगर पालिका पिंपरी पुणे ४११०१८

(गीता गायकवाड)
अपर तहसिलदार पिंपरी चिंचवड
ता.हवेली जि.पुणे